RNI No. MAHBIL/064/13/1/2012
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक - नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - ७, अंक - १० ] सोमवार, सप्टेंबर २४, २०१८ / आश्विन २, शके १९४० [ पृष्ठे ८

**असाधारण क्रमांक १०**

## प्राधिकृत प्रकाशन

### उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांजकडून

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत शिर्डी विमानतळ अधिसूचित क्षेत्रांसाठी अधिकार प्रदान करणे*

**सूचना**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (महा. क्र. XXXVII, १९६६)*

क्रमांक म.वि.वि.कं./शिर्डी/३१/८२५/२०१८.–ज्याअर्थी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (यापुढे जिचा उल्लेख “एमएडीसी” करण्यात आला आहे) जी कंपनी, अधिनियम, १९५६ अन्वये संस्थापित आहे आणि महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखाली कार्य करीत आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक XXXVII, १९६६) च्या कलम ४० च्या उप-कलम (१-बी) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला, काकडी, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर येथील शिर्डी विमानतळाच्या अधिसूचित क्षेत्रांसाठी शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१६०८/२६६२/प्र. क्र. १११/०९/नवि-९, दिनांक २८ मे २००९ द्वारा “विशेष नियोजन प्राधिकरण” म्हणून नियुक्त केलेले आहे;

आणि ज्याअर्थी, सदरहू अधिनियमाच्या कलम ४० च्या उप-कलम *(३)* मध्ये तरतूद केल्याप्रमाणे उक्त अधिनियमाच्या प्रकरण ६ च्या तरतुदी, मिहान अधिसूचित क्षेत्राला नवीन नगर समजून विकास प्राधिकरणाप्रमाणेच विशेष नियोजन प्राधिकरणाला लागू आहेत.

आणि ज्याअर्थी, सदरहू अधिनियमाच्या कलम १५१ आणि कलम १५२ च्या पहिल्या परंतुकाच्या अन्वये नवीन नगर विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना प्रदान केलेल्या प्राधिकरणाच्या अधिकारांचा वापर व कार्य पार पाडत असलेल्या जबाबदाऱ्या यांची जनतेला माहितीसाठी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५२ व इतर सक्षम अधिकारांद्वारे एमएडीसीला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून संचालक मंडळाने दिनांक १० ऑगस्ट २०१८ रोजी झालेल्या ६४ व्या बैठकीत ठरावाप्रमाणे प्राधिकरणाच्या विविध अधिकाऱ्यांना सदर अधिनियमाच्या उद्दिष्टांसाठी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना, अधिकार प्रदान करणारा खालील ठराव संमत करण्यात आला आहे.

“असा ठराव करण्यात येतो की, सदर संचालक मंडळ, जोडपत्र-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शिर्डी विमानतळ अधिसूचित क्षेत्रांसाठी अधिकार प्रदान करण्यासाठी मान्यता देत असून तसेच अधिनियमांतर्गत विविध अधिकार वापर करण्यासंबंधीचे प्रशासकीय आदेश व नगररचना अधिकारी व अतिरिक्त नगररचना अधिकारी यांना प्राधिकृत करण्याचा अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यात येत आहे.”

"संचालक मंडळ असाही ठराव मंजूर करीत आहे की, अधिकार प्रदान करण्यासंबंधीची माहिती, जनतेच्या माहितीसाठी महाराष्ट्र शासन राजपत्र आणि स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यासाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

"ठरावात पुढे असेही नमूद करण्यात येत आहे की, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना ठरावाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आवश्यक कोणतीही कृती, कृत्य, बाबी आणि इतर गोष्टी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे."

**जोडपत्र - १**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेली) च्या कलम १५२ नुसार व त्याअनुषंगाने सक्षम असलेल्या अधिकारांचा वापर करून एमएडीसी याद्वारे त्यांच्या खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना अधिनियमाच्या विविध कलमांनुसार विविध कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्राधिकर्ता अधिकारी | अधिकारांचा वापर करण्याचा आणि काम करण्याचा अधिकार दिलेले एमएडीसीचे अधिकारी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | **नियोजन विभाग** | |
| १ | प्राधिकृत नगररचना अधिकारी (टीपीओ) | कलम २५, ४३, ४४, ४५, ४६, ४८, ५१, ५२ ते ५८, ८९, ९०, १०७, ११२, १२४ के, १३५ आणि १३६, कार्यारंभ दाखला (सीसी) दिल्यानंतर, भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) निर्गमित होईपर्यंत. |
| २ | अतिरिक्त नगररचना अधिकारी (एटीपीओ) | कलम २५, ४३, ४४, ४५, ४६, ४८, ५१, ५२ ते ५८, ८९, ९०, १०७, ११२, १२४ के, १३५ आणि १३६, कार्यारंभ दाखला (सीसी) दिल्यानंतर, भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) निर्गमित होईपर्यंत. |
| ३ | वरिष्ठ नियोजनकार, अतिरिक्त मुख्य नियोजनकार | कलम ४३, ४४, ४५, ४६, ५२ ते ५८, ८९, ९०, १०७, ११२, १२४ के, १३५ आणि १३६, कार्यारंभ दाखला (सीसी) दिल्यानंतर, भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) निर्गमित होईपर्यंत. |
| | **अनधिकृत बांधकाम नियंत्रक** | |
| ४ | अनधिकृत बांधकाम नियंत्रक (सीयुसी) | एमएडीसीच्या कार्यक्षेत्रातील सर्व अथवा कोणत्याही अनधिकृत व बेकायदा विकासाबाबत कलम ५२ ते ५७, ११२, १२४ के, १३५ आणि १३६ अंतर्गत सर्व अधिकार. |
| ५ | अधीक्षक अभियंता | एमएडीसीच्या कार्यक्षेत्रातील सर्व अथवा कोणत्याही अनधिकृत व बेकायदा विकासाबाबत कलम ५२ ते ५७, ११२, १२४ के, १३५ आणि १३६ अंतर्गत सर्व अधिकार. |
| ६ | कार्यकारी अभियंता | एमएडीसीच्या कार्यक्षेत्रातील सर्व अथवा कोणत्याही अनधिकृत व बेकायदा विकासाबाबत कलम ५२ ते ५७, ११२, १२४ के, १३५ आणि १३६ अंतर्गत सर्व अधिकार. |
| | **भूमि अभिलेख विभाग** | |
| ७ | भूमि अभिलेख खातेप्रमुख | प्रकल्पात येणाऱ्या सर्व शासकीय जमिनी व महसूल अभिलेखातील तपशीलवारनुसार गावठाण हद्दीपासून २०० कि. मी. पर्यंत येणाऱ्या जमिनी व त्याबाबत कलम ५२ ते ५७, ११२, १२४ के, १२६ (१), १३५ आणि १३६ अंतर्गत सर्व अधिकार. |
| ८ | अतिरिक्त जिल्हाधिकारी | प्रकल्पात येणाऱ्या सर्व शासकीय जमिनी व महसूल अभिलेखातील तपशीलवारनुसार गावठाण हद्दीपासून २०० कि. मी. पर्यंत येणाऱ्या जमिनी व त्याबाबत कलम ५२ ते ५७, ११२, १२४ के, १२६ (१), १३५ आणि १३६ अंतर्गत सर्व अधिकार. |

**जोडपत्र - १** — *चालू*

| अ. क्र. | प्राधिकर्ता अधिकारी | अधिकारांचा वापर करण्याचा आणि काम करण्याचा अधिकार दिलेले एमएडीसीचे अधिकारी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | **भूमि अभिलेख विभाग** — *चालू* | |
| ९ | उपजिल्हाधिकारी | प्रकल्पात येणाऱ्या सर्व शासकीय जमिनी व महसूल अभिलेखातील तपशीलवारनुसार गावठाण हद्दीपासून २०० कि. मी. पर्यंत येणाऱ्या जमिनी व त्याबाबत कलम ५२ ते ५७, ११२, १२४ के, १२६ (१), १३५ आणि १३६ अंतर्गत सर्व अधिकार. |
| | **मालमत्ता विभाग** | |
| १० | विपणन खातेप्रमुख / महाव्यवस्थापक (विपणन) | कलम ५२ ते ५७, १२४ के, १३५ सर्व अधिकार<br>(१) करारपट्टा (Agreement to Lease) केल्यानंतर व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व नियोजन अधिनियमाच्या कलम ४५ नुसार कार्यारंभ प्रमाणपत्र (सीसी) निर्गमित करण्यापूर्वीपर्यंत सर्व भूखंड.<br>(२) भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) निर्गमित केल्यानंतर<br>(३) एमएडीसीची सर्व बांधकामे जमिनीसह |
| ११ | वरिष्ठ विपणन व्यवस्थापक | कलम ५२ ते ५७, १२४ के, १३५ सर्व अधिकार<br>(१) करारपट्टा (Agreement to Lease) केल्यानंतर व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व नियोजन अधिनियमाच्या कलम ४५ नुसार कार्यारंभ प्रमाणपत्र (सीसी) निर्गमित करण्यापूर्वीपर्यंत सर्व भूखंड.<br>(२) भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) निर्गमित केल्यानंतर<br>(३) एमएडीसीची सर्व बांधकामे जमिनीसह |
| १२ | विपणन व्यवस्थापक | कलम ५२ ते ५७, १२४ के, १३५ सर्व अधिकार<br>(१) करारपट्टा (Agreement to Lease) केल्यानंतर व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व नियोजन अधिनियमाच्या कलम ४५ नुसार कार्यारंभ प्रमाणपत्र (सीसी) निर्गमित करण्यापूर्वीपर्यंत सर्व भूखंड.<br>(२) भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) निर्गमित केल्यानंतर<br>(३) एमएडीसीची सर्व बांधकामे जमिनीसह |
| १३ | मालमत्ता अधिकारी | कलम ५२ ते ५७, १२४ के, १३५ सर्व अधिकार<br>(१) करारपट्टा (Agreement to Lease) केल्यानंतर व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व नियोजन अधिनियमाच्या कलम ४५ नुसार कार्यारंभ प्रमाणपत्र (सीसी) निर्गमित करण्यापूर्वीपर्यंत सर्व भूखंड.<br>(२) भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) निर्गमित केल्यानंतर<br>(३) एमएडीसीची सर्व बांधकामे जमिनीसह |

**जोडपत्र - १** — *चालू*

| अ. क्र. | प्राधिकर्ता अधिकारी | अधिकारांचा वापर करण्याचा आणि काम करण्याचा अधिकार दिलेले एमएडीसीचे अधिकारी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | **आदेश व कागदपत्रे प्रमाणिकरण** | |
| १४ | मुख्य नियोजनकार, अतिरिक्त मुख्य नियोजनकार, वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ, महाव्यवस्थापक (विपणन), वरिष्ठ विपणन व्यवस्थापक, विपणन व्यवस्थापक, मालमत्ता अधिकारी, अधिकृत बांधकाम नियंत्रक, कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता, महाव्यवस्थापक (तांत्रिक), संयुक्त महाव्यवस्थापक, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, अन्य खाते प्रमुख/ विभाग प्रमुख, की ज्यांच्याकडे हे आदेश जारी करण्याचा/ कागदपत्रे तयार करण्याचा वा ताब्यात ठेवण्याचा अधिकार आहे. | कलम १३९ अंतर्गत आदेश व कागदपत्रे प्रमाणित करण्याचे सर्व अधिकार |
| १५ | सहव्यवस्थापकीय संचालक / व्यवस्थापकीय संचालक | कलम १४२ आणि १४३ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यास मान्यता व अपराध सामोपचाराने निकालात काढणे. |

प्रदान केलेले उपरोक्त अधिकार सर्वसाधारण स्वरूपाचे असून ते पुढील बाबींच्या अधीन राहतील.

१. उपरोक्त सर्व प्रकरणांमध्ये उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांनी प्राधिकृत केलेले प्रत्येक खात्यातील अधिकारी हे प्रदत्त अधिकारांनुसार पावले उचलण्यास जबाबदार राहतील.

२. एमएडीसीच्या विविध खात्यांना नेमून दिलेली विवक्षित कामे व जबाबदाऱ्यांचे स्वरूप लक्षात घेता उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक हे उपरोक्त कलमांन्वये दिलेले विविध अधिकार वापरण्यासाठी उपरोक्त परिशिष्टातील विशिष्ट कलमांनुसार कोणत्याही अधिकाऱ्याला सक्षम प्राधिकर्ता म्हणून अधिकार देऊ शकतील.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांचे कार्यालयीन आदेश एमएडीसीच्या वेबसाईटवर उपलब्ध राहतील. https://madc.maharashtra.gov.in

संचालक मंडळ, एमएडीसीच्या आदेशानुसार,

**सुरेश काकाणी,**
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित,
मुंबई.

मुंबई, १८ सप्टेंबर २०१८.

---

*Power of Delegation under Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for Shirdi Airport Notified Area.*

## Notice

*Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. Act. XXXVII of 1966)*

No. MADC/Shirdi/31/815/2018.– Whereas, the Maharashtra Airport Development Company Limited (hereinafter referred to by its acronym “MADC”) is a company incorporated under the Companies Act, 1956 and functions under the superintendence and control of the Government of Maharashtra;

and whereas, Government of Maharashtra has in exercise of its power under sub-section *(1-B)* of Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) appointed MADC to be the Special Planning Authority for the Shirdi Airport Notified Area, Shirdi *vide* GR. No. TPS-1608/2662/CR-111/09/UD-9, dated 28th May 2009;

and whereas, it is provided in sub-section *(3)* of Section 40 of the said Act that, the provisions of Chapter VI of the said Act apply *mutatis mutandis* to the Special Planning Authority as they apply in relation to a Development Authority as if the notified area were a new town;

and whereas, the New Town Development Authority is, under Section 151 of the said Act, read with the first proviso to Section 152 of the said Act required to publish in the Maharashtra Government Gazette, the Officers of the Authority who will exercise powers and perform the functions of the Authority, for the information of the public;

and whereas, in exercise of the powers conferred upon MADC under provisions of Section 152 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and all other powers enabling it in this behalf, the Board of Directors in its 64th meeting held on 10th August 2018 has passed the following Resolution, delegating its powers and functions for the purpose of the said Act to its Officers designated therein.

"Resolved that the Board do hereby approve the Power of Delegation as per "Annexure-1" of the foregoing agenda note and authorize Vice Chairman and Managing Director to issue administrative instructions regarding exercise of powers under the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 including designating Town Planning Officer and Additional Town Planning Officer to deal with the Development Proposal and other functions as per the said Act for Shirdi Airport Notified Area, Shirdi."

"Resolved further that the Board do hereby authorize Vice Chairman and Managing Director to publish delegation of powers for information of Public in Maharashtra Government Gazette and as well as local newspapers."

"Resolved further that the Vice Chairman and Managing Director be and is hereby authorized to do all such acts, deeds, matters and things as may be deemed necessary or expedient to give effect to the resolution."

**Annexure - 1**

Delegation of Powers for Shirdi Airport Notified Area, Shirdi.

In exercise of powers conferred under Section 152 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") and all powers enabling in this behalf the Maharashtra Airport Development Company Ltd. hereby designates its Officers to exercise its powers and perform the functions under various Sections of the said Act as under –

| Sr. No. | Designated Officer | Nature of Powers to be exercised and performed |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| | **Planning Department** | |
| 1 | Designated Town Planning Officer (TPO) | All powers under Sections 25, 43, 44, 45, 46, 48, 51, 52 to 58, 89, 90, 107, 112, 124 K, 135 and 136, after granting Commencement Certificate (CC), till grant of Occupancy Certificate (OC). |
| 2 | Additional Town Planning Officer (ATPO) | All powers under Sections 25, 43, 44, 45, 46, 48, 51, 52 to 58, 89, 90, 107, 112, 124 K, 135 and 136, after granting Commencement Certificate (CC), till grant of Occupancy Certificate (OC). |
| 3 | Sr. Planner, Additional Chief Planner | All powers under Sections 43, 44, 45, 46, 52 to 58, 89, 90, 107, 112, 124 K, 135 and 136, after granting Commencement Certificate (CC), till grant of Occupancy Certificate (OC). |

**Annexure - 1** – *contd.*

| Sr. No. | Designated Officer | Nature of Powers to be exercised and performed |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| | **Controller of Unauthorized Constructions** | |
| 4 | Controller of Unauthorised Constructions (CUC) | Shall exercise all powers under Sections 52 to 57, 112, 124 K, 135 and 136 in respect of all or any unauthorized / illegal Development within the jurisdiction of MADC. |
| 5 | Superintending Engineer | Shall exercise all powers under Sections 52 to 57, 112, 124 K, 135 and 136 in respect of all or any unauthorized / illegal Development within the jurisdiction of MADC. |
| 6 | Executive Engineer | Shall exercise all powers under Sections 52 to 57, 112, 124 K, 135 and 136 in respect of all or any unauthorized / illegal Development within the jurisdiction of MADC. |
| | **Lands and Survey Department** | |
| 7 | Designated Head of Land and Survey Section. | All powers under Sections 52 to 57, 112, 124 K, 126 *(1),* 135 and 136 for the lands which are within 200 m. from the Gaothan Boundary revenue records specifications and Government lands falling within the Project Area. |
| 8 | Additional Collector | All powers under Sections 52 to 57, 112, 124 K, 126 *(1)*, 135 and 136 for the lands which are within 200 m. from the Gaothan Boundary revenue records specifications and Government lands falling within the Project Area. |
| 9 | Deputy Collector | All powers under Sections 52 to 57, 112, 124 K, 126 *(1)*, 135 and 136 for the lands which are within 200 m. from the Gaothan Boundary revenue records specifications and Government lands falling within the Project Area. |
| | **Estate Department** | |
| 10 | Head of Mkt. Sections/GM (Mkt.) | All powers under Sections 52 to 57, 124 K, 135<br>(1) In respect of plots, after execution of agreement to lease and before grant of Commencement Certificate (CC) under Section 45 of the MRTP Act.<br>(2) In respect of all properties, after grant of Occupancy Certificate (OC).<br>(3) All MADC constructed premises, including land attached thereto. |

**Annexure - 1** – *contd.*

| Sr. No. | Designated Officer | Nature of Powers to be exercised and performed |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| | **Estate Department** – *contd.* | |
| 11 | Sr. Marketing Manager | All powers under Sections 52 to 57, 124 K, 135<br>(1) In respect of plots, after execution of agreement to lease and before grant of Commencement Certificate (CC) under Section 45 of the MRTP Act.<br>(2) In respect of all properties, after grant of Occupancy Certificate (OC).<br>(3) All MADC constructed premises, including land attached thereto. |
| 12 | Marketing Manager | All powers under Sections 52 to 57, 124 K, 135<br>(1) In respect of plots, after execution of agreement to lease and before grant of Commencement Certificate (CC) under Section 45 of the MRTP Act.<br>(2) In respect of all properties, after grant of Occupancy Certificate (OC).<br>(3) All MADC constructed premises, including land attached thereto. |
| 13 | Estate Officer | All powers under Sections 52 to 57, 124 K, 135<br>(1) In respect of plots, after execution of agreement to lease and before grant of Commencement Certificate (CC) under Section 45 of the MRTP Act.<br>(2) In respect of all properties, after grant of Occupancy Certificate (OC).<br>(3) All MADC constructed premises, including land attached thereto. |
| | **Authentication of Orders and Documents** | |
| 14 | Chief Planner, Additional Chief Planner, Sr. Architect, GM (Mkt), Sr. MM. MM, Estate Officer, CUC, ED, CE, GM (Tech.), Joint GM, Supdt. Engineer, Executive Engineer, other Heads of Departments / Sections who are the Initiators / Custodians of such Orders / Documents. | All powers under Section 139 for Authentication of Orders / Documents. |
| 15 | JMD / MD | All powers under Sections 142 and 143 for sanction of prosecution and compounding of offences. |

The above delegation of powers is General in nature and subject to the following.

1. In all the above cases, the Officers so designated by VC and MD in each Department shall be responsible for taking steps as per delegation of power.

2. Having regard to the nature of duties and functions to be performed by the various Departments of MADC, VC and MD may assign the powers under the above Sections to any of the designated Officers mentioned against the specific Sections in the above schedule.

The office order issued by VC and MD as above shall be uploaded on MADC. website https://madc.maharashtra.gov.in

*By Order of the Board of Directors, MADC,*

**SURESH KAKANI,**

Vice Chairman and Managing Director,
Maharashtra Airport Development Company Limited,
Mumbai..

Mumbai, 18th September 2018.

---

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI. SANJAY BABURAO WAICHAL, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006. EDITOR : SHRI. SANJAY BABURAO WAICHAL.